19 OCT 2022
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# युवक महोत्सवाचा देशभरात लौकिक : शिर्के

लोकमत न्यूज नेटवर्क

आटपाडी : विद्यार्थी कलाकारांच्या कलागुणांनी शिवाजी विद्यापीठाच्या युवक महोत्सवाचा लौकिक संपूर्ण देशात पोहोचला आहे. देशभरातील कलाप्रकारांची ओळख नव्याने घडवून देणारा हा उपक्रम म्हणजे संस्कृती जतन करण्याचा सोहळाच असल्याचे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

येथील श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालयात आयोजित ४२ व्या मध्यवर्ती युवक महोत्सवाच्या पारितोषिक वितरणप्रसंगी ते बोलत होते. यावेळी दि आटपाडी एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अमरसिंह देशमुख, डॉ. सुभाष करांडे, एच. यू. पवार, विद्यार्थी विकास संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, प्राचार्य विजय लोंढे, डॉ. दत्तात्रय जाधव, प्राचार्या डॉ. योजना जुगळे, प्राचार्य डॉ. विजया चव्हाण, डॉ. विनोद ठाकूर-देसाई, नीलेश ढामसे, प्रा. अभय जयभाये उपस्थित होते.



आटपाडी येथे मंगळवारी शिवाजी विद्यापीठाच्या ४२ व्या मध्यवर्ती युवक महोत्सवाच्या समारोप कार्यक्रमाचे उद्घाटन कुलगुरू डी. टी. शिर्के यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. यावेळी विजय लोंढे, शरद मेमाणे आदी उपस्थित होते.

शिर्के म्हणाले, आटपाडीसारख्या दुष्काळी व ग्रामीण भागामध्ये मध्यवर्ती युवक महोत्सवाचे नियोजन करण्याचे शिवधनुष्य या महाविद्यालयाने पेलले. विद्यापीठाच्या कार्यशाळेमधून कलाकारांचा दर्जा व गुणवत्ता सुधारण्यास मदत झाली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत ४० टक्क्यांनी विद्यार्थ्यांचा सहभाग वाढला आहे.

## इंद्रधनुष्यसाठी उद्या निवड चाचणी

राज्यस्तरीय इंद्रधनुष्य महोत्सव राहुरी विद्यापीठामध्ये आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये शिवाजी विद्यापीठाचा संघ सहभागी होणार आहे. यासाठी विद्यार्थ्यांची गुरुवारी निवड चाचणी घेतली जाणार आहे, असे डॉ. गुरव यांनी सांगितले.

पारितोषिक वितरण सोहळ्यापूर्वी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासमोर दहिवडी महाविद्यालयाच्या कलाकारांनी पोतराज नृत्य, सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालयाने लावणी नृत्य, यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाने आदिवासी नृत्य, तर आजरा विद्यालयाने रँबेनचो नृत्य सादर केले.

# मध्यवर्ती युवा महोत्सवात कोल्हापूरचा डंका

## तरुणाईचा जल्लोष : लोककला, शास्त्रीय नृत्य, नाटक, संगीत विभागात 'विवेकानंद'ची बाजी

लक्ष्मण सरगर
लोकमत न्यूज नेटवर्क

**आटपाडी :** तरुणाईच्या जल्लोषात पार पडलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या ४२ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये कोल्हापूरच्या विवेकानंद महाविद्यालय, आजरा महाविद्यालयाने वर्चस्व सिद्ध केले. सरदार बाबासाहेब माने लोककला व लोकनृत्य फिरता चषक, विलिंग्डन महाविद्यालय शताब्दी महोत्सव फिरता चषक पटकावला. विवेकानंदच्या संघाने वैयक्तिक व सांघिक दोन्ही प्रकारात प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार उत्कृष्ट चॅम्पियनशिप पटकावली.

स्पर्धेचा निकाल (अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय) वैयक्तिक स्पर्धा प्रकार : शास्त्रीय नृत्य : रत्नाप्पा कुंभार (कोल्हापूर), आनंदराव नाईक (चिखली), शिंदे कॉलेज (कोल्हापूर). नकला : वाय. सी. इन्स्टिट्यूट (सातारा), राजाराम (कोल्हापूर), मुधोजी (फलटण).

एकपात्री अभिनय : सावित्रीबाई फुले महिला (सातारा), व्यंकटेश्वरा (देसनाका), गव्हर्न्मेंट इंजिनिअरिंग (कराड), रत्नाप्पा कुंभार (कोल्हापूर) (विभागून). सुगम गायन : आर्ट्स, कॉमर्स, सायन्स (कराड), विलिंग्डन (सांगली), न्यू कॉलेज (कोल्हापूर). शास्त्रीय गायन : शिवाजी विद्यापीठ, न्यू कॉलेज (कोल्हापूर), विवेकानंद



आटपाडी येथे मंगळवारी शिवाजी विद्यापीठाच्या ४२ व्या मध्यवर्ती युवक महोत्सवाच्या समारोपप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासमोर विद्यार्थ्यांनी कलाविष्कार सादर केला. यावेळी आटपाडी एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अमरसिंह देशमुख, डॉ. सुभाष कराडे, एल. यू. पवार, डॉ. आर. व्ही. गुरव, प्राचार्य विजय लोंढे, डॉ. दत्तात्रय आदी उपस्थित होते.

(कोल्हापूर).

पाश्चिमात्य एकल गायन : देशभक्त रत्नाप्पा कुंभार (कोल्हापूर), विवेकानंद (कोल्हापूर), डी. वाय. पाटील (कोल्हापूर), यशवंतराव चव्हाण (सातारा) (विभागून). शास्त्रीय सुरवाद्य : आनंदराव नाईक (चिखली), देशभक्त रत्नाप्पा कुंभार (कोल्हापूर), विवेकानंद (कोल्हापूर). शास्त्रीय तालवाद्य : यशवंतराव चव्हाण (इस्लामपूर), आनंदराव नाईक (चिखली), अण्णासाहेब डांगे (आष्टा). पाश्चिमात्य एकल वादन : बापूजी साळुंखे (मिरज), विवेकानंद (कोल्हापूर), गव्हर्न्मेंट इंजिनिअरिंग (कराड).

स्थळचित्रण : दत्ताजीराव कदम (इचलकरंजी), शिवराज (गडहिंग्लज), सद्गुरू (कराड). कोलाज : दत्ताजीराव कदम (इचलकरंजी), शिवाजी विद्यापीठ, मुधोजी (फलटण), विवेकानंद (कोल्हापूर) (विभागून). भित्तीचित्र : सावित्री फुले महिला (सातारा), मुधोजी (फलटण), आनंदराव नाईक (चिखली). कातरकाम : शिवराज (गडहिंग्लज), सद्गुरू (कराड), न्यू कॉलेज (कोल्हापूर). स्थळ छायाचित्रण : विवेकानंद (कोल्हापूर), मुधोजी (फलटण), आजरा (आजरा). मातीकाम : राजाराम (कोल्हापूर), दत्ताजीराव कदम (इचलकरंजी), वेणूताई चव्हाण (कराड), डी. पी. भोसले (कोरेगाव) (विभागून). रांगोळी : यशवंतराव (इस्लामपूर), कलाप्रबोधिनी (कोल्हापूर), शिवराज (गडहिंग्लज). मेहंदी : चव्हाण (सातारा), नाना पाटील (वाळवा), डी. वाय. पाटील (कोल्हापूर). वक्तृत्व (मराठी) : भोगावती (कुरुकली), गणपती (सांगली), छत्रपती शिवाजी (सातारा). वक्तृत्व (हिंदी) : डी. पी. भोसले (कोरेगाव), न्यू कॉलेज (कोल्हापूर), आरवाडे (सांगली). वक्तृत्व (इंग्रजी) : विवेकानंद (कोल्हापूर), गव्हर्न्मेंट कॉलेज (कराड), शिवाजी विद्यापीठ (कोल्हापूर). लोकनृत्य : आजरा महाविद्यालय (आजरा), यशवंतराव चव्हाण (इस्लामपूर), यशवंतराव चव्हाण (सातारा), दत्ताजीराव कदम (इचलकरंजी) (विभागून). लोकसंगीत : सावित्रीबाई फुले महिला (सातारा), विवेकानंद (कोल्हापूर) (विभागून), आक्कातार्इ पाटील (इचलकरंजी), दहिवडी (दहिवडी) (विभागून), आनंदराव नाईक (चिखली), श्री वेंकटेश (इचलकरंजी) (विभागून). एकांकिका : दत्ताजीराव कदम (इचलकरंजी), कृष्णाबाई कदम (कडेगाव), आर्ट्स अँड कॉमर्स (नागठाणे).

सर्वोत्कृष्ट पुरुष अभिनय एकांकिका : विवेकानंद (कोल्हापूर), छत्रपती शिवाजी (सातारा), सर्वोत्कृष्ट स्त्री अभिनय एकांकिका : आर्ट्स अँड कॉमर्स (नागठाणे), दत्ताजीराव कदम (इचलकरंजी), शंकरराव जगताप (वाघोली), कृष्णाबाई कदम (कडेगाव) (विभागून).

लघुनाटिका : श्री शिवशाहू (सरूड), मुधोजी (फलटण), धनंजयराव गाडगीळ (सातारा), भारती इंजिनिअरिंग (कोल्हापूर). मूकनाट्य : दहिवडी कॉलेज (दहिवडी), विवेकानंद (कोल्हापूर), रत्नाप्पा कुंभार (कोल्हापूर). पथनाट्य : राजमती (सांगली), विवेकानंद (कोल्हापूर), कृष्णाकाठ (बेडग). भारतीय समूह गीत : विवेकानंद (कोल्हापूर), रत्नाप्पा कुंभार (कोल्हापूर), दत्ताजीराव कदम (इचलकरंजी). पाश्चिमात्य समूहगीत : विवेकानंद (कोल्हापूर), मुधोजी (फलटण), यशवंतराव चव्हाण (सातारा). लोकवाद्य वृंद : मुधोजी (फलटण), विवेकानंद (कोल्हापूर), आनंदराव नाईक (चिखली), यशवंतराव चव्हाण (इस्लामपूर) (विभागून).

सांघिक रचना कृती : कॉलेज ऑफ आर्किटेक्चर (कोल्हापूर), शिवाजी विद्यापीठ (कोल्हापूर), रत्नाप्पा कुंभार (कोल्हापूर). वाद विवाद : गव्हर्न्मेंट कॉलेज (कराड), विलिंग्डन (सांगली), केआयटी कॉलेज (कोल्हापूर). प्रश्नमंजूषा : यशवंतराव चव्हाण (सातारा), तात्यासाहेब कोरे इंजिनिअरिंग (वारणानगर), डी. पी. भोसले (कोरेगाव).

सरदार बाबासाहेब माने लोककला फिरता चषक : सावित्रीबाई फुले (सातारा) व विवेकानंद (कोल्हापूर). सरदार बाबासाहेब माने लोकनृत्य फिरता चषक : आजरा महाविद्यालय (आजरा). विलिंग्डन महाविद्यालय शताब्दी महोत्सव फिरता गौरव चषक : नृत्य विभाग : लोकनृत्य : आजरा महाविद्यालय (आजरा), लोककला : सावित्रीबाई फुले (सातारा), शास्त्रीय नृत्य : विवेकानंद (कोल्हापूर).

नाट्य विभाग : विवेकानंद (कोल्हापूर), संगीत विभाग : विवेकानंद (कोल्हापूर), कला विभाग : दत्ताजीराव कदम (इचलकरंजी), वाङ्मय विभाग : गव्हर्न्मेंट इंजिनिअरिंग (कराड).

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ भगवान महावीर अध्यासनाच्या गरजू विद्यार्थ्यांना आर्थिक मदत

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ भगवान महावीर अध्यासनामधील गरजू विद्यार्थ्यांना आर्थिक मदत देण्यात आली. भगवान महावीर अध्यासनामार्फत पदवी व प्रमाणपत्र अभ्यासक्रम शिकवले जातात. काही महिला विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमास प्रवेश घेणे आर्थिक अडचणीने शक्य नव्हते. सल्लागार समितीच्या बैठकीत पाच गरजू विद्यार्थ्यांना अध्यासनात प्रवेश घेण्यासाठी आवश्यक ती फी सवलत देण्याबाबत कुलगुरुंनी मार्गदर्शन केले. त्यानुसार उद्योजक सुरेंद्र जैन यांनी पाच महिला अभ्यासकाची सर्व फी देणगी स्वरूपात दिली. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन शिंदे, भगवान महावीर अध्यासनचे समन्वयक प्रा. डॉ. विजय ककडे, डॉ. जे. एफ. पाटील आदी उपस्थित होते.

पुढारी

# स्कूल ऑफ नॅनो सायन्समध्ये राष्ट्रीय परिसंवाद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी, इंडियन सोसायटी फॉर रेडिएशन अँड फोटो केमिकल सायन्सेस (इस्त्राप) मुंबई व महाराष्ट्र ॲकॅडमी ऑफ सायन्सेस कोल्हापूर चॅप्टर यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. परिसंवादाचे उद्‌घाटन प्र. कुलगुरू प्रा. पी. एस. पाटील यांनी केले. त्यांनी बीएआरसी व शिवाजी विद्यापीठातील प्राध्यापकांचे एकत्रित प्रकल्प, त्याचा विद्यार्थ्यांना फायदा या विषयावर मार्गदर्शन केले.

'बीएआरसी'च्या शास्त्रज्ञांनी विद्यापीठातील विविध विभागस भेट देऊन प्रध्यापकासोबत चर्चा केली. परिसंवादामध्ये भाभा अणू संशोधन केंद्रातून सात, पुण्यातील तीन व विद्यापीठातील एका शास्त्रज्ञाने मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुणे प्रा. अविनाश कुंभार व डॉ. बिना सिंग यांनी इस्त्राप सोसायटीची उद्दिष्टे सांगितली. परिसंवादाचे प्रा. किरणकुमार शर्मा, निमंत्रक डॉ. के. डी. पवार यांनी आभार मानले.

पुढारी

# युवा महोत्सवात विवेकानंद कॉलेजला सांघिक विजेतपद

आटपाडी : शिवाजी विद्यापीठाच्या मध्यवर्ती युवा महोत्सवात प्रथम कुलगुरू स्वर्गीय डॉ. आप्पासाहेब पवार वैयक्तिक स्पर्धा जनरल चॅम्पियनशीप फिरता चषक आणि अभिजितदादा कदम सांघिक स्पर्धा जनरल चॅम्पियनशीप फिरता चषक उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर कोल्हापूरच्या विवेकानंद कॉलेजने पटकावला. विविध कला प्रकारातील महाविद्यालयांना आणि विद्यार्थ्यांना कुलगुरू डॉ. डी. टी.शिर्के, अमरसिंह देशमुख, डॉ. आर. व्ही. गुरव व मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले.

पुण्यनगरी

# स्कूल ऑफ नॅनो सायन्समध्ये राष्ट्रीय परिसंवाद उत्साहात

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजीमध्ये एकदिवसीय राष्ट्रीय परिसंवाद उत्साहात पार पडला. इंडियन सोसायटी फॉर रेडिएशन अँड फोटो केमिकल सायन्सेस मुंबई (इस्त्राप), स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी शिवाजी विद्यापीठ आणि महाराष्ट्र अकॅडमी ऑफ सायन्सेस कोल्हापूर चॅप्टर यांच्या संयुक्त विद्यमाने परिसंवाद आयोजित करण्यात आला होता.

परिसंवादाचे उद्‌घाटन प्र. कुलगुरू पी. एस. पाटील यांच्या हस्ते पार पडले.

प्रमुख पाहुणे प्रा. अविनाश कुंभार व डॉ. बिना सिंग यांनी इस्त्राप सोसायटीची उद्दिष्टे आणि माहिती दिली. परिसंवादाचे अध्यक्ष प्रा. किरणकुमार शर्मा यांनी स्वागत केले. निमंत्रक डॉ. के. डी. पवार यांनी आभार मानले.

19 OCT 2022
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



विज्ञानाच्या विश्वात

डॉ. व्ही.एन. शिंदे

# मी कशाला आरशात...

सकाळी, सकाळी 'मी कशाला आरशात पाहू गं...' हे गीत ऐकले आणि आरसा मनात बसला. आरसा परावर्तनाच्या क्रियेतून प्रतिबिंब दाखवतो. आरसा काचेचा बनलेला असतो. काचेपासून अनेक वस्तू बनतात. ग्लास, फुलदाणी, ताट, मिसळसाठी बाउल, प्रयोगशाळेतील भिंग, ब्युरेट, पिपेट, कोनिकल फ्लास्क सगळे काही काचेचे! तापमापी, दाबमापी, उपकरणाचे मापन दर्शवणारे मीटर झाकायची आवरणे, घराच्या काचा आणि काही भिंतीसुद्धा काचेच्या. सर्वत्र काचच काच. काच वाळूपासून बनते, असे विचार मनात सुरू असतानाच आठवले की २०२२ हे 'आंतरराष्ट्रीय काच वर्ष' म्हणून साजरे करावे, असे राष्ट्रसंघाने जाहीर केले आणि मनात काचेचा शोध सुरू झाला.

काच काही विशिष्ट पदार्थांपासून बनत नाही, ती एक स्थिती आहे. मानव काचेचा वापर अनादी कालापासून करत आला आहे. काच घन पदार्थ आहे. वितळलेल्या काही अन्य घटकांसमवेत सिलिका आणि सिलिकेट अचानक थंड केले की, पदार्थाची ही अवस्था मिळते. काचेतील अणूंना योग्य जागा निवडून बसण्यासाठी वेळ मिळू दिला जात नाही. त्यामुळे काच पारदर्शक असूनही अस्फटिकी आहे. काच ठिसूळ असते. काच फुटल्यावर तिचे टोकदार तुकडे होतात. त्यामुळे फुटलेल्या काचा गोळा करताना काळजी घ्यावी लागते. काच उष्णता आणि विद्युतची दुर्वाहक आहे. गुस्ताव टुमान यांनी १९०३ साली काच हा वेगाने थंड केलेला द्रव आहे असा दावा केला. सिलिका आणि अनेक मूलद्रव्यांच्या ऑक्साईडपासून काचा बनवतात. मात्र, कृत्रिमरित्या काचा तयार करण्यापूर्वीपासून मानव काचेचा वापर करत आहे. ज्वालामुखीचा उद्रेक झाल्यानंतर त्यातून लाव्हा बाहेर पडतो. त्यामध्ये वितळेली सिलिका, सिलिकेट आणि विविध मूलद्रव्यांची ऑक्साईड द्रवरूपात असतात. हा लाव्हा थंड होताना नैसर्गिक काच तयार होते. यामध्ये सुमारे ७५ टक्के सिलिका असते. नैसर्गिक काचेचा रंग काळा असतो. पूर्वी नैसर्गिक काच दुर्मिळ असल्याने रत्नाप्रमाणे वापरत. स्त्रिया काचेचे दागिने वापरत. काचेचे मौल्यवान भांडे फोडल्याबद्दल औरंगजेबाने एका सरदारास देहदंडाची शिक्षा सुनावली होती. काही फिनिशियन व्यापारी वाळवंटात चुनखडीच्या दगडाच्या चुलीवर स्वयंपाक करत होते. स्वयंपाक झाल्यानंतर त्यांना चुलीखाली काच तयार झालेली सापडली. इसवी सन पूर्व ३००० वर्षांपूर्वी कृत्रिम काच प्रथम सिरियात तयार झाली असे मानले जाते. इसवी सन पूर्व ३०० ते २०० वर्षांपूर्वी तेथील लोकांनी फुंकनळीच्या सहाय्याने काचेला आकार देण्याचे तंत्र शोधले. काही संशोधक इजिप्तला काचेची जन्मभूमी मानतात. इजिप्तमध्ये पूर्वीच्या काळात काच कारखाने असल्याचे पुरावे मिळतात. मात्र, काचेचा शोध इजिप्तमध्ये लागल्याचे ठोस पुरावे नाहीत. सिरियामधून इजिप्तमध्ये हे तंत्रज्ञान गेले असावे. इसवी सन पूर्व १५०० ते ३०० वर्षांपूर्वी इजिप्तमध्ये काचेची भांडी बनवण्याचे तंत्र विकसीत झाले. सन ४७६ मध्ये रंगीत काचांचा खिडक्यांसाठी वापर सुरू झाला. सन १२०० मध्ये रंगहीन पारदर्शक काच तयार झाली. त्यानंतर दीडशे वर्षांनंतर मिनाकाम आणि मुलामा देण्याचे तंत्र विकसीत झाले. १६७४ मध्ये इंग्लंडमध्ये काच बनवली. फ्रान्समध्ये १७९० साली उपकरणांसाठी काच बनवली. पुढे शंभर वर्षांनंतर अमेरिकेत काचेचा कारखाना सुरू झाला. विसाव्या शतकाच्या सुरुवातीस काचेपासून बाटल्या बनवण्याचे तंत्र विकसीत झाले. १९२६ मध्ये गाड्यांसाठी सुरक्षित काचेचा शोध लागला. त्यानंतर एका तपामध्ये काचतंतू बनवले गेले. काचेच्या तंतूमुळे आजचे संदेशवहन एवढे गतिमान झाले आहे. भारतात आधुनिक काच व्यवसायाची सुरुवात १८७० मध्ये झाली. पहिल्या महायुद्धाच्या काळात भारतात १६ काच कारखाने उभारण्यात आले. १९०८ मध्ये भारतीयांनी उभारलेला पहिला काच कारखाना ओगलेवाडी येथे सुरू झाला. तेथील प्रभाकर कंदील देशभर प्रसिद्ध होता. देशभरात स्वातंत्र्यपूर्व काळात साठपेक्षा जास्त कारखाने सुरू झाले. भारतात काच बनवण्यासाठी मोठ्या प्रमाणात कच्चा माल आणि कुशल मजूर उपलब्ध होते. त्यात भारत सरकारने स्वातंत्र्य मिळताच काच उद्योगास संरक्षण दिले. भारतात तावदानी काच, तंतूरूप काच, नळ्या, प्रकाशीय काच, बाटल्या, काचपात्रे, बांगड्या, मणी, दिव्यांची काच, भांडी तयार करण्यात येतात. भारतात आज ७० कारखाने असून सव्वाचार लाख टन उत्पादन होते. भारतातून काच साहित्याची आयातीपेक्षा निर्यात जास्त होते. हा व्यवसाय विदेशी चलन मिळवून देणारा आहे. काच सहसा रासायनिक प्रक्रियेमध्ये भाग घेत नाही. त्यामुळे काचपात्रांचा उपयोग आम्ले आणि रसायनांना साठवण्यासाठी केला जातो. हायड्रोफ्लोरीक आम्ल वगळता अन्य आम्ले काचेवर कोणताही परिणाम करत नाहीत. काचेवर चित्रे काढण्यात येतात. हायड्रोफ्लोरीक आम्लाच्या सहाय्याने नक्षीकाम करतात. काचेला गरम करून हवा तसा आकार देता येतो. काचेचा पुनर्वापर करता येतो. मात्र, अनेक रसायनांवर प्रकाशाचा परिणाम होतो, म्हणून रसायनांसाठी रंगीत काचा वापरतात. काचेमध्ये लोह, क्रोमिक ऑक्साईड, फेरिक ऑक्साईड, कॉपर ऑक्साईड यापैकी एक पदार्थ मिसळून हिरव्या रंगाची काच बनते. सोने किंवा तांबे मिसळून तांबड्या, आयर्न डायसल्फाईड मिसळून अंबर रंगाची, युरेनियम डाय ऑक्साईड मिसळून पिवळी, कोबॉल्ट ऑक्साईड मिसळून निळी, मँगेनीज डाय ऑक्साईड मिसळून जांभळी काच मिळते; तर कॅल्शियम फ्लुरोईड मिसळून अपारदर्शक दुधी काच बनते. अशी ही काच नसती तर न्यूटनने प्रकाशातील सात रंग दाखवण्यासाठी प्रिझमऐवजी काय वापरले असते? सेल्सियसने तापमापी आणि टॉरिसेलीने दाबमापी कसा बनवला असता? विज्ञानाच्या प्रगतीत काचेचे योगदान मोठे आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे काच नसती तर... आरसा तयार करण्यापूर्वी मानव स्वतःचे प्रतिबिंब पाण्यात पाहायचा. काच नसती तर कवीला 'मी कशाला पाण्यात पाहू ग...' असे गाणे लिहावे लागले असते आणि अर्थाचा अनर्थ झाला असता.

संपर्क : ९६७३७८४४००

19 OCT 2022
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सोना माळी यांनी जपला लाखमोलाचा ठेवा

## ३०० पेक्षा अधिक ओव्या मुखोद्‍गत; शिवाजी विद्यापीठाकडून ध्वनिमुद्रण

**ओंकार धर्माधिकारी : सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १८ : कागलच्या सोना माळी यांना सुमारे ३०० पेक्षा अधिक ओव्या मुखोद्‍गत आहेत. यामध्ये संताच्या ओव्या आहेतच. मात्र, बहुतांशी ओव्या या नातेसंबंधांवरच्या, मानवी भावनांवरच्या आहेत. त्यांच्या रुपाने हा लाखमोलाचा ठेवा जतन झाला आहे. शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागांतर्गत असलेल्या राजर्षी शाहू लोकविद्या आणि लोकसंस्कृती अभ्यास केंद्रात सोनाबाईंना मुखोद्‍गत असणाऱ्या सर्व ओव्यांचे त्यांच्या आवाजात रेकॉर्डिंग करून ठेवले आहे.

ओवी हा लोकसाहित्याचा प्रकार सर्वत्र पाहायला मिळतो. आजही ग्रामीण भागातील महिला काम करता करता ओवी गुणगुणतात. मात्र, अशा ओव्या मुखोद्‍गत असणाऱ्या महिलांची संख्या कमी होताना दिसते. या ओव्या म्हणजे आपला सांस्कृतिक ठेवा आहे. त्यामुळे तो जतन करणे आवश्यक आहे. कागलच्या डी. आर. माने महाविद्यालयातील मराठी विषयाच्या प्राध्यापिका निला जोशी यांना माळी यांची माहिती समजली. त्यांनी त्यांच्याशी संपर्क केला. त्यानंतर विद्यापीठाच्या राजर्षी शाहू लोकविद्या आणि लोकसंस्कृती अभ्यास केंद्राने माळी यांना विद्यापीठात बोलावले. त्यांना पाठ असणाऱ्या ३०० ओव्या त्यांनी ध्वनिमुद्रित केल्या. माळी यांचे वय ८० आहे. विठ्ठल, रुक्मिणी, दत्त, आंबाबाई, रेणुका, कृष्णा, गणपती, राम, सीता, मारुती, खंडोबा यांच्यावरील ओव्या त्यांना पाठ आहेत. तसेच विविध नातेसंबंधांवरील ओव्याही त्या म्हणतात. राजर्षी शाहू महाराज यांच्यावरील ओव्यातून त्या शाहू चरित्र मांडतात.


सोना माळी

> ओवी हा आपला सांस्कृतिक आणि सामाजिक इतिहास आहे. यामध्यमातून आपल्याला त्या-त्या काळातील समाजजीवन अभ्यासता येते. त्या-त्या काळातील नातेसंबंध, चालीरिती समजावून घेता येतात. हा एकप्रकारचा अनमोल ठेवा असून, तो आता लुप्त होण्याच्या मार्गावर आहे. म्हणूनच सोना माळी यांच्या ओव्यांचे ध्वनिमुद्रण करून हा ठेवा जतन केला आहे.
> 
> – प्रा. डॉ. नंदकुमार मोरे, मराठी भाषा विभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ

### ४९ कलाप्रकारांचे बनवले दस्ताऐवज

राजर्षी शाहू लोकविद्या आणि लोकसंस्कृती अभ्यास केंद्राचे काम कौतुकास्पद आहे. त्यांनी आतापर्यंत सुमारे ४९ कलाप्रकारांचे दस्ताऐवज बनवले आहेत. याचा सुमारे ६०० जी.बी.चा डाटा त्यांच्याकडे आहे. १४०० कलाकारांची यादी त्यांनी बनवली असून, ती शासनाला दिली आहे. लोककलांचे संकलन आणि संवर्धन करण्यासाठी आता महाविद्यालयांमध्ये सम्नवयकही नेमले जाणार आहेत.

19 OCT 2022
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ निवडणुकीत सर्वांचे उमेदवार निश्चित

## आघाडी, स्वबळासाठी चाचपणी : लवकर चित्र होणार स्पष्ट

**कोल्हापूर, ता. १८ :** शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा आणि विविध प्राधिकरणाच्या निवडणुकीसाठी विद्यापीठ विकास आघाडी, विद्यापीठ विकास मंच आणि शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा) यांच्या उमेदवारांची यादी निश्चित झाली आहे. आघाडी आणि विकास मंच यांची गेल्या वेळी युती झाली होती. यंदाही ती होईल, असे सांगितले जात आहे; मात्र सर्वांनीच उमेदवार निश्चित केले असून, आघाडी करायची की स्वबळावर लढायचे याची चाचपणी सुरू आहे. लवकरच याबाबत निर्णय होईल, असे सर्वच संघटनांच्या प्रमुखांनी संकेत दिले आहेत. आज ३ जणांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. विद्यापीठाच्या अधिसभा आणि विविध प्राधिकरणासाठीच्या निवडणुका १४ नोव्हेंबरला होणार आहेत, तर १६ नोव्हेंबरला मतमोजणी होईल. यासाठी उमेदवारी अर्ज भरण्यास प्रारंभ झाला आहे. २८ ऑक्टोबरपर्यंत अर्ज भरता येणार आहेत. सुटाने आपले उमेदवार निश्चित करण्यासाठी मुलाखती घेतल्या असून, त्यांनी उमेदवारांची यादी नक्की केली आहे. सुमारे ८० उमेदवार निश्चित केले आहेत, तर विकास आघाडीने इच्छुकांच्या मुलाखती घेण्यास सुरुवात केली आहे.

### संघटनांमधील गट सक्रिय



'सुटा'मधील काही सदस्य विद्यापीठ विकास आघाडी किंवा विकास मंचबरोबर जावे, अशा मताचे आहेत. त्यामुळे त्यांनी संघटनेकडे त्याचा आग्रह धरला आहे, तर विद्यापीठ विकास मंचचे काही सदस्य स्वबळावर निवडणूक लढवावी, या मताचे आहेत. लवकरच सर्व संघटनांचे चित्र स्पष्ट होणार आहे.

> **“ शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा) यांनी निवडणूक स्वबळावर लढवण्याचा निर्णय घेतला आहे. आम्ही अन्य कोणासोबतही जाणार नाही. सर्वच जागांवर उमेदवार उभे करणार असून, त्यासाठी मुलाखती घेऊन उमेदवारांची निश्चितीही केली आहे.**
>
> **- प्रा. डॉ. डी. एन. पाटील**
> (प्रमुख कार्यवाह, सुटा)

विद्यापीठ विकास मंचनेही उमेदवारांची निश्चिती केली असून, पदवीधर मधील १० उमेदवारांची नावे निश्चित झाल्याचे समजते.

जनसंपर्क कक्ष
19 OCT 2022 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सुरेन्द्र जैन यांची भगवान महावीर अध्यासनाच्या विद्यार्थ्यांना आर्थिक मदत

**कोल्हापूर :** भगवान महावीर अध्यासन शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर मार्फत पदवी व प्रमाणपत्र अभ्यासक्रम घेतले जातात. त्यातून जैनधर्माची मूलतत्वे, शास्त्रीय बैठक, श्रावकाचार याचे मार्गदर्शन केले जाते. या अभ्यासक्रमास वयोमर्यादा नसल्याने याला चांगला प्रतिसाद मिळत आहे. काही विद्यार्थी विशेषत: महिला या अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यास तयार आहेत. परंतु त्यांना आर्थिक अडचणीने शक्य नव्हते. याबाबत २३ सप्टेंबर रोजी झालेल्या सल्लागार समितीच्या बैठकीत ५ विद्यार्थ्यांना भगवान महावीर अध्यासनामध्ये प्रवेश घेण्यासाठी आवश्यक ती फी सवलत देण्याबाबत कुलगुरूंनी मार्गदर्शन केले.

यामध्ये कोल्हापूरचे सुप्रसिध्द उद्योजक व सल्लागार समितीचे सदस्य सुरेन्द्र जैन यांनी ५ महिला अभ्यासकांची सर्व फी आपण देणगी स्वरूपात देत असल्याचे जाहीर केले व सत्वर १५,५०० रुपयांचा चेकही दिला. तसेच एस पी वेल्थचे प्रवर्तक अनिल पाटील यांनी देखील गरजू विद्यार्थ्यांना मदत देण्याची तयारी दर्शवली. त्यांच्या या स्वयंस्फूर्त देणगीबद्दल भगवान महावीर अध्यासनचे समन्वयक प्रा. डॉ. विजय ककडे तसेच शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही एन शिंदे तसेच देणगी समितीचे अध्यक्ष डॉ. जे एफ पाटील यांनी सुरेन्द्र जैन यांचे आभार मानले आहेत.

अशा प्रकारची शैक्षणिक मदत देणारे शिवाजी विद्यापीठातील भगवान महावीर अध्यासन शिवाजी विद्यापीठाची विद्यार्थ्यांप्रती बांधिलकी स्पष्ट करते.